IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 11, March 2025
Impact Factor: 7.67

# व्यष्टी अध्ययन पद्धती

सहा. प्रा. नंदकिशोर आत्माराम पाटील
भूगोल विभाग प्रमुख
दोशी वकील आर्ट्स कॉलेज आणि जी. सी. यू. बी. सायन्स आणि कॉमर्स कॉलेज,
गोरेगाव ता. माणगाव जि. रायगड
आणि
डॉ. देवकर भाऊसाहेब सोनाजी,
(भूगोल विभाग) सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.

**सारांश**

सामाजिक संशोधनात व्यष्टी अध्ययन पद्धतीचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला जातो. म्हणजे तथ्ये कसे शोधून काढावयाचे आणि त्याचे निष्कर्ष काय येतील हे बघण्यासाठी या तंत्राचा संशोधन प्रक्रियेत वापर करून घेतला जातो. एककाचा सर्वांगीण अभ्यास करणे हा या तंत्राचा प्रमुख उद्देश असतो. ही एक गुणात्मक संशोधन पद्धत आहे. ज्यामध्ये मर्यादित संख्येतील घटना किंवा परिस्थिती आणि त्यांच्या संबंधांचे सखोल, संदर्भात्मक विश्लेषण समाविष्ट असते. ही पद्धत सामाजिक विज्ञान, शिक्षण, व्यवसाय आणि आरोग्य संशोधनात विशेषतः प्रचलित आहे, जिथे जटिल घटना वास्तविक जीवनातील संदर्भांमध्ये समजून घेतल्या पाहिजेत. व्यष्टी अध्ययन अन्वेषणात्मक, स्पष्टीकरणात्मक किंवा वर्णनात्मक असू शकतात. डेटा संकलनात सामान्यतः मुलाखती, निरीक्षणे आणि दस्तऐवज विश्लेषण यासारखे अनेक स्रोत समाविष्ट असतात.

**बीजसंज्ञा** :- व्यष्टी अध्ययन पद्धती, व्याख्या, वैशिष्ट्ये, गृहितके, प्रकार, फायदे, तोटे

## प्रस्तावना

सामाजिक संशोधनात व्यष्टी अध्ययन पद्धती ही फार महत्वाची मानली जाते. समाजशास्त्रीय संशोधन प्रक्रियेत तथ्य संकलन करण्यासाठी अनेक पद्धतीत या तंत्राचा उपयोग केला जातो. व्यष्टी अध्ययन हे सुध्दा एक तंत्र किंवा पध्दती आहे, की ज्यामुळे एखाद्या निश्चित अभ्यासासंबंधित माहिती संकलित केली जाते. विशिष्ट अध्ययन पध्दतीला व्यष्टी अध्ययन, विशिष्टाभ्यास, वैयक्तिक अभ्यास, घटकाभ्यास पध्दती असेही म्हटले जाते. शैक्षणिक व सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात व्यष्टी अध्ययन पद्धती (Case Study Method) ही एक अत्यंत महत्त्वाची व परिणामकारक संशोधन पद्धती मानली जाते. या पद्धतीद्वारे एखाद्या व्यक्ती, घटने, संस्थे, समुदाय किंवा प्रक्रियेचा सखोल व सर्वांगीण अभ्यास केला जातो. 'व्यष्टी' म्हणजे एखादी विशिष्ट एकक—जी व्यक्ती, गट, संस्था, घटना, प्रक्रिया यापैकी काहीही असू शकते. संशोधकाला विशिष्ट बाबीचा तपशीलवार अभ्यास करायचा असेल, तर ही पद्धत फार उपयुक्त ठरते. या पद्धतीत प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, दस्तऐवजांचे विश्लेषण यांचा वापर केला जातो. त्यामुळे संशोधन अधिक वास्तवदर्शी बनते.

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 11, March 2025 Impact Factor: 7.67

## व्यष्टी अध्ययन पद्धती

### अर्थ

इंग्रजीतील Case या शब्दासाठी व्यष्टी हा शब्द वापरला जातो. मानवी वर्तनाशी निगडित असणाऱ्या अनेकविध विषयांचा सांगोपांग अभ्यास समाजशास्त्रीय संशोधनात हाती घेता येतो. विविध सांस्कृतिक समूह, कुटुंब, राजकीय पक्ष, नेत्यांचा गट इत्यादी लहान सहान समूह अध्यनाबरोबरच पंथ, राष्ट्रीय व वांशिक समूह, सामाजिक संस्था, लहान व मोठ्या जमाती इत्यादींचा परिपूर्ण अभ्यास केला जाते. त्यालाच विशिष्टाभ्यास म्हणता येईल. मग हा अभ्यास एखाद्या व्यक्तीचा अगर एखाद्या समूहाचा अगर सामाजिक संस्थेचा अगर एखाद्या जमातीची असो, तेव्हा अभ्यासासाठी निवडलेल्या विषयाच्या एककाची सूक्ष्म व सखोल, सर्वकष व तपशीलवार माहिती संकलित करण्याच्या पध्दतीस विशिष्टाभ्यास पध्दती म्हणतात.

### व्याख्या

१) **श्रीमती यंग** - "व्यष्टी अध्ययन पद्धती कोणत्यातरी सामाजिक एककाचे / मग तो एकक व्यक्ती, परिवार, संस्था, वर्ग अथवा जाती असो, संशोधन व विवेचन करण्याची एक पद्धती होय."

२) **गुड आणि हॅट** - "व्यष्टी अध्ययन म्हणजे सामाजिक तथ्यांचे संकलन करण्याचा असा विधी आहे की ज्याच्या अध्ययनामुळे सामाजिक एककाचे (Unit) एकात्म स्वरूप पूर्ण रक्षण केले जाते." दुसऱ्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ह्या प्रकारच्या अध्ययनात सामाजिक एककाचा (Unit) त्याच्या समग्र स्वरूपासह अभ्यास केला जातो.

३) **विसेन्ज आणि विसेन्ज ह्यांच्या मते**, 'व्यष्टी अध्ययन हे गुणात्मक विश्लेषणाचे एक स्वरूप असून त्यात एखादी व्यक्ती, संस्था किंवा परिस्थितीचा फार काळजीपूर्वक अभ्यास केला जातो.

"वरील व्याख्यावरून हे स्पष्ट होते की, एखादी व्यक्ती, संस्था, समुदाय किंवा परिवार इत्यादी बाबतीत व्यक्तीगत रूपाने पूर्णज्ञान प्राप्त करून घेण्याची व्यक्तीगत (व्यष्टी) अध्ययन ही एक महत्वूपर्ण पद्धती आहे. ही अध्ययन पद्धती गुणात्मक विश्लेषणाचे एक स्वरूप आहे. पद्धतीत संशोधक एखाद्या व्यक्तीशी, संस्थेशी, समुहाशी संबंधित होऊन आपल्या वैयक्तिक पात्रतेचा उपयोग करून त्या त्या एककाचा अभ्यास करतो."

### व्यष्टी अध्ययन पद्धतीची वैशिष्ट्ये

१) **सखोल व सर्वांगीण अभ्यास** :- या पद्धतीत विशिष्ट व्यक्ती, संस्था किंवा घटनेचा बारकाईने आणि खोलवर अभ्यास केला जातो.

२) **एकक केंद्रित पद्धत** :- या पद्धतीमध्ये एकाच विशिष्ट घटकावर (व्यक्ती, गट, संस्था इ.) लक्ष केंद्रित केले जाते.

३) **वास्तविक परिस्थितीचा अभ्यास** :- व्यासंगी अभ्यास वास्तविक जीवनातील घटनेवर आधारित असतो, त्यामुळे संशोधन अधिक व्यवहार्य व उपयोगी ठरते.

४) **गुणात्मक (Qualitative) स्वरूप** :- ही पद्धत प्रामुख्याने वर्णनात्मक व गुणात्मक माहितीवर आधारित असते. संख्यात्मक माहिती दुय्यम असते.

५) **नैसर्गिक वातावरणात अभ्यास** :- संशोधक त्या व्यक्तीच्या नैसर्गिक (natural) व वास्तव जीवनात जाऊन माहिती गोळा करतो.

६) **वेगवेगळ्या माहिती संकलन तंत्रांचा वापर** :- निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, दस्तऐवज विश्लेषण इत्यादी तंत्रांचा वापर करून माहिती गोळा केली जाते.

७) **कारण-परिणाम नातेसंबंध समजण्यास मदत** :- एखाद्या वर्तनामागे किंवा समस्येमागे असलेली पार्श्वभूमी व कारणे शोधण्यात ही पद्धत उपयुक्त ठरते.

८) **लवचिकता** :-या पद्धतीत संशोधनाच्या प्रक्रियेत लवचिकता असते. माहिती संकलन व विश्लेषण या दोन्ही टप्प्यांमध्ये बदल करता येतो.

९) **उपयुक्तता – शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात** :- ही पद्धत शिक्षक, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, डॉक्टर, व्यवस्थापक इत्यादींसाठी उपयुक्त ठरते.

## व्यष्टी अध्ययन पद्धतीतील गृहितके

१) **मानवी स्वभावातील मुलभूत समानता** - सर्व मानव समान नसतात हे जरी खरे असले तरी अनेक समान मौलिक प्रवृत्तीच्या त्यांच्या ठिकाणी असतात. म्हणजे प्रत्येक मानव परस्पराहून भिन्न असला तरी त्याच्या मुलभूत प्रवृत्ती समान आहेत.

२) **काल तत्वाचा अभाव** - कोणत्याही घटनेची कारणे निश्चित कालावधीत शोधली जाऊ शकत नाही. अनेक घटनांची मूळे भूतकाळात असतात. त्यामुळे कोणत्याही समस्येचा अभ्यास करतांना त्याच्या मुळाशी जाऊन त्याची पूर्व कारणे शोधणे आवश्यक ठरते.

३) **सर्वांगीण अध्ययन** - ह्या पद्धतीत होणारे अध्ययन सर्वांगी असते.

४) **घटनांची जटिलता** - सामाजिक घटना ह्या अत्यंत जटील असतात. अनेक प्रकारच्या भावभावना किंवा मूल्ये यावर मानवी व्यवहार आधारलेले असतात.

५) **परिस्थितीचा प्रभाव** - परिस्थितीनुरूप मानव व्यवहार घडत असतात. म्हणून ह्या अभ्यास पद्धतीत कोणकोणत्या परिस्थितीत मानव कसा व्यवहार करतो, ह्याचा अभ्यास केला जातो. परिस्थितीनुरूप व्यवहार बदलतात. त्यामुळे त्या विशिष्ट परिस्थितीचाही अभ्यास ह्या पद्धतीत करावा लागतो.

## व्यष्टी अध्ययनाचे प्रकार

१) **व्यक्तीचे व्यष्टि अध्ययन** - ह्या प्रकारात एखाद्या व्यक्तीचे अथवा त्याच्या जीवनातील घटनेचे अध्ययन केले जाते. व्यक्तीच्या अभ्यासात, त्याच्या कुटुंबातील सदस्य, त्या व्यक्तीशी संबंधित असलेल्या व्यक्ती व मित्र व त्या व्यक्तीचे स्वतःचे अनुभव ह्यांचा अभ्यास मुलाखत घेऊन केला जातो तसेच त्यांची वैयक्तिक पत्रे, लेख, दैनंदिनी, आत्मकथा, चरित्रे इत्यादी लिखित साहित्याचा उपयोग केला जातो.

२) **समुदायाचे व्यष्टी अध्ययन** - ह्या प्रकारात एखादा वर्ग समूह अथवा संस्था हा अभ्यासविषय असतो. किंवा एखाद्या समुदायाच्या विशिष्ट अंगाचा अभ्यास केला जातो. ह्या अध्ययनात संशोधकाचे चातुर्य, बुद्धी, अनुभव व परिश्रम कसाला लागतात. कारण कोणत्याही समुदायाच्या आंतरिक जीवनाचा अभ्यास करणे हे अत्यंत कठीण कार्य असते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 11, March 2025 Impact Factor: 7.67

### व्यष्टी अध्ययनाची प्रक्रिया

१) **समस्येचे स्पष्टीकरण व्यष्टी** - अध्ययनाला प्रारंभ करण्यापूर्वी ज्या समस्येचा अभ्यास करावयाचा आहे त्याचे स्पष्टीकरण व्हावे लागते, समस्येच्या भिन्न पैलूंचेही स्पष्टीकरण करावे लागते तरच त्या समस्येशी संबंधित तथ्ये कोणती हे कळून येते.

२) **घटनांचा अनुक्रम** - समस्येची व्याख्या व स्पष्टीकरण केल्यानंतर त्या समस्येशी संबंधित घटनांचा क्रम लक्षात घ्यावा लागतो. एका विशिष्ट कालखंडात घटनांच्या स्वरूपात कोणता फरक पडला ह्याचे सविस्तर वर्णन करावे लागते.

३) **घटनांचे कारक अथवा कारणे** - त्या घटनांना प्रेरित करणाऱ्या कारणांचा अथवा स्थितीच्या कारकांचा विचार करावा लागतो म्हणजे घटनेची कारणे शोधावी लागतात. अर्थात वर्तमानकालीन स्थिती हा भूतकालीन कारणांचा परिणाम असतो.

४) **विश्लेषण व निष्कर्ष** - अशारीतीने वर्तमानकालीन स्थितीची कारणे शोधल्यानंतर त्या कारणांचे विश्लेषण करून त्यावरून काही सामान्य निष्कर्ष काढावे लागतात. हे निष्कर्ष अशारीतीने काढावे की ज्यामुळे संबंधित एककांचे संपूर्ण स्वरूप लक्षात येईल.

### व्यष्टि अध्ययन पद्धतीचे फायदे

१) **महत्वपूर्ण गृहितकृत्याचे साधन** - व्यष्टी-अध्ययन पद्धती महत्वपूर्ण गृहितकृत्य निर्माण करण्यास उपकारक ठरते. ह्या पद्धतीत एककांचा सूक्ष्म व गहन अभ्यास केला जातो व निष्कर्ष काढले जातात.

२) **अध्ययन साधनांची निर्मिती करण्यास सहाय्यक** - ही अध्ययन पद्धती अनेक प्रकारे महत्वपूर्ण अभ्यास साधने निर्माण करण्यास उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ-प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत-मार्गदर्शिका इत्यादी.

३) **वर्गीकरण करण्यास सहाय्यक** - व्यष्टी अध्ययनामुळे एखाद्या समूहातील भिन्न भिन्न एककांचे वर्गीकरण करणे सुलभ होते. कारण ह्या पद्धतीत समूहाचा सूक्ष्म अभ्यास केला जातो. त्यामुळे त्या समूहातील भिन्न भिन्न एककांची वैशिष्ट्ये कळून येतात, त्यांच्या आधारावर त्यांचे भिन्न भिन्न वर्गात विभाजन करणे सोपे होते.

४) **सूक्ष्म व गहन अभ्यास** - व्यष्टी अध्ययनात संबंधित एककाचा अत्यंत विस्तृत व गहन अभ्यास केला जातो. तसेच प्रत्येक एककाच्या सर्व अंगाचा म्हणजे सर्वांगीण व संपूर्ण अभ्यास होतो. विशेषतः कोणत्याही घटनेची भूतकालीन अवस्था समजून घेण्यास ही पद्धत फार उपयुक्त आहे.

५) **विरोधी एककांचे ज्ञान** - व्यष्टी अध्ययन पद्धतीमुळे विरोधी एककांचा शोध लागतो. विरोधी एकक ह्याचा अर्थ जे एकक निश्चित गृहितकृत्याच्या अगदी उलट असतात. यथार्थ निष्कर्ष काढण्यासाठी अशा विरोधी एककांचे ज्ञान आवश्यक असते. असे ज्ञान फक्त व्यष्टी अध्ययनामुळेच होऊ शकते.

६) **सामुग्रीची संपूर्णता** - ह्या पद्धतीत एकत्र केलेली सामुग्री स्वतःच पूर्ण असते.

७) **विशिष्ट पैलूंचे अध्ययन** - ह्या प्रणालीत व्यष्टीची विशिष्ट प्रवृत्ती आणि प्रेरणा ह्यांचा अभ्यास होतो. कारण त्यांचा परस्पर संबंध असतो.

ISSN: 2581-9429 Volume 5, Issue 11, March 2025 Impact Factor: 7.67

८) **संशोधकाच्या अनुभवात भर** - ह्या पद्धतीमुळे संशोधकाला व्यापक अनुभव प्राप्त होतात. समस्येचा अभ्यास करता करता भिन्न भिन्न प्रकारचे अनुभव गोळा होतात.

९) **सामाजिक मूल्ये व धारणा ह्यांचे ज्ञान** - व्यष्टी अध्ययनामुळे व्यष्टीच्या धारणा आणि मूल्ये ह्यांचा अभ्यास सहजपणे करता येतो. तसेच सामाजिक मूल्ये व धारणा ह्यामुळे समाजात भविष्यात कोणते परिवर्तन घडून येईल.

१०) **जीवन प्रभावित करणाऱ्या कारणांचा अभ्यास** - व्यष्टी अध्ययन पद्धतीत जीवनाचा संपूर्ण अभ्यास केला जातो. त्यामुळे जीवनाच्या भावनात्मक प्रक्रिया जाणून घेण्यास सहाय्यक होते.

**व्यष्टि अध्ययन पद्धतीचे तोटे**

१) **असंघटित व अवैज्ञानिक पद्धत** - ही पद्धत असंघटित व अवैज्ञानिक आहे. कारण ह्या पद्धतीत एककाची निवड करणे आणि तथ्ये प्राप्त करणे ह्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसते. तसेच कोणत्याही वैज्ञानिक व संघटित पद्धतीचे सहाय्य घेतले जात नाही. शिवाय ह्या पद्धतीमुळे प्राप्त झालेल्या तथ्यांची सत्यता पारखता येत नाही, कारण तशी सत्यता मापण्यासाठी कोणताही मापदंड नाही. संशोधकाचे अनुभव व ज्ञान हाच एक मापदंड असतो व त्याच्या आधारे तो जे म्हणेल तेच सत्य समजावे लागते.

२) **सीमित क्षेत्राचे अध्ययन** - ह्या पद्धतीद्वारे विस्तृत क्षेत्राचे अध्ययन करणे शक्य नसते. सर्व लक्ष एककावरच केन्द्रित असते, म्हणून फक्त एकाच एककाशी संबंधित विस्तृत ज्ञान मिळू शकते, अन्य एककांच्या बाबतीतील ज्ञान मिळत नाही.

३) **अप्रामाणिक पद्धत** - ह्या पद्धतीत संशोधक जी सामुग्री एकत्रित करतो त्याची विश्वसनीयता पारखता येत नाही. एखाद्या व्यक्तीने चुकीची माहिती दिली असेल तर संशोधक त्याच्या प्रामाणिकतेची पडताळणी करू शकत नाही.

४) **पक्षपाताची समस्या** - ह्या पद्धतीत अभ्यासामध्ये पक्षपातीपणा येण्याचा संभव असतो. संशोधक एकाच व्यक्तीच्या बाबतीत सर्व घटनांचा व तथ्यांचा अभ्यास करतो. कारण त्या घटना त्याच्या स्वतःच्या जीवनात घडलेल्या असतात.

५) **नमूना पद्धतीवर आधारित नाही** - ही व्यष्ट्री अध्ययन पद्धत नमुना पद्धतीवर (Sampling Method) आधारित नाही. त्यामुळे ह्या पद्धतीत प्रातिनिधीक एककाचा अभ्यास होऊ शकत नाही.

६) **दोषपूर्ण सामान्यीकरण** - ह्या पद्धतीत काही थोड्या एककाच्या आधारे सामान्य निष्कर्ष काढले जातात. हे निष्कर्ष सर्वच एककांना लागू होतील असे म्हणता येत नाही, म्हणून ह्या पद्धतीत काढलेले निष्कर्ष दोषपूर्ण असतात.

७) **दोषपूर्ण जीवन इतिहास** - ह्या पद्धतीत जीवन इतिहास किंवा चरित्र-आत्मचरित्र हा एक तथ्य संकलनाचा स्त्रोत आहे. हे जीवन इतिहास खरे व वस्तुनिष्ठ असतीलच अशी खात्री कोणीही देऊ शकणार नाही. त्यात असत्य, अतिशयोक्ती, पक्षपातीपणा, आत्मस्तुती इत्यादी दोष असतात.

८) **अधिक वेळ व अधिक खर्च** - प्रत्येक एककाचा संपूर्ण व सर्वांगीण अभ्यास करावयाचा असल्यामुळे स्वाभाविकपणे अधिक पैसा व वेळ खर्च होतो.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 5, Issue 11, March 2025
Impact Factor: 7.67

## निष्कर्ष

वरील व्यष्टी अध्ययनसंदर्भात दिलेली माहिती जसे व्यष्टी अध्ययनपद्धतीच्या व्याख्या, वैशिष्टये, प्रक्रिया, फायदे, मर्यादा, गृहितके, इत्यादी माहितीवरून आपणस असे दिसून येते की, व्यष्टी अध्ययनपद्धत ही संशोधन कार्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडते. व्यष्टी अध्ययन पद्धती सामाजिक संशोधनात ती एक महत्वाची पद्धत मानली जाते. व्यष्टी अध्ययन पद्धतीमुळे घटनेशी संबंधित असणारी अनेक सूक्ष्मातिसूक्ष्म, आंतरिक तसेच गोपनीय तथ्ये स्पष्ट होतात. त्यामुळे घटनेचे वास्तविक व यथार्थअध्ययन करणे सुलभ होते.

## संदर्भ ग्रंथ

१) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र – विद्या प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती; जानेवारी २०००. पृ. ११९ ते १२१
२) दु.का. संत, संशोधन पद्धती प्रक्रिया अंतरंग विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती; जानेवारी, २००७
३) कराडे बी. एम., शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर, २०१८
४) पाटील वा. भा., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
५) घाटोळ रा. ना., समाजशास्त्र संशोधन तत्व व पद्धती मंगेश प्रकाशन, नागपुर
६) Ahuja Ram, Research Methods, Jaipur, Rawat Publication. (2001)
७) Giridhari. D.G., Research Methodology in Social Science, Aurangabad, Uday Publication. .(2002)
८) Gupta Santhosh , Research Methodology & Statistical Techniques, New Delhi, Deep & Deep Publication. (1993),


DOI: 10.48175/IJARSCT-26559